




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०५ | अंक : २८५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२७ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# चंद्रपूर-गडचिरोलीतील २३ नगरसेवक नॉट रीचेबल, प्रत्येकाला ५ लाख देऊन फोडले?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, नागपूर :** महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्व विदर्भातील राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी थेट घोडेबाजाराचे गंभीर आरोप करत मोठा राजकीय गौप्यस्फोट केला आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेसचे जवळपास २३ नगरसेवक संपर्काबाहेर असल्याचा दावा करत त्यांना पैशांच्या जोरावर फोडण्यात आल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

आमचे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचे जवळपास २३ नगरसेवक नॉट रीचेबल आहेत, आणि मी १०० टक्के सांगतो की, पाच-पाच लाख रुपये देऊन त्यांना उचलले आहे. आमची ती सगळी लोकं पैशाने विकली गेलेली आहेत. आता व्हीप जारी करून त्यांच्या घराला व्हीप चिपकवणार आहोत, आणि त्या नगरसेवकांना अपात्र करण्याची कारवाई आम्ही सुरू करू, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.

काँग्रेसच्या नगरसेवकाचा भाजपचे आमदार बंटी भांगडीया यांच्यासोबतचा फोटो समोर आला आहे. यावर विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. फोटो जुना आहे की आताचा हे मी सांगू शकत नाही. परंतु एक नक्की आहे की, चंद्रपूरमध्ये घोडा बाजार प्रचंड तेजीत आहे, आणि त्यांनी तो घोडेबाजार सुरू केलेला आहे.

या घोडा बाजाराची गरजही नव्हती, पण आमदार, ठेकेदार झाल्यानंतर पैशांची गर्मी आणि मस्ती येतेच, ती मस्ती त्यामध्ये दिसते आहे,. बिना श्रमाने लोकप्रतिनिधी म्हणून आता आमदाराचे ठेकेदार व्हायला



लागले, तर काय नीतिमत्ता, नैतिकता काय राहिली, राजकारणात सत्ता आणि पावर हे दोन्ही एकत्र घेऊन काम होत राहिलं तर सामान्य जनतेचे हाल होणारच आहे, असा टोलाही वडेट्टीवार यांनी लगावला.

बंटी भांगडिया यांनी, तुमचे नगरसेवक तुम्ही सांभाळू शकला नाही, त्यात आमचे नाव का घेताय?, असा सवाल उपस्थित केला होता. त्यावर विजय वडेट्टीवार यांनी प्रत्युत्तर दिले. जर राज्यात सत्ता नसती तर कुत्रही मागे गेलं नसतं, सत्ता जाऊ दे आणि ने म्हणा उचलत, कोणात किती दम आहे तर. सत्तेचा उपयोग काही लोकांना धाक देण्यासाठी करायचा, बँकेच्या संचालकांना धाक द्यायचा, यामुळे काही लोकांना घाबरवलं. तर एका ठिकाणी सरपंचाचा मुलगा आहे, त्याला तुरुंगात टाकण्याचे धमकी दिली. अशा धमक्या देऊन राजकारण सुरू आहे, असा गंभीर आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला.

**प्रत्येकी ५ लाख दिल्याचा वडेट्टीवारांचा आरोप**

मी पुन्हा जबाबदारीने सांगतो, पाच-पाच लाख रुपये त्यांना देण्यात आले आहेत आणि माझ्याकडे तसे पुरावे आहेत. माझ्याकडे माझ्या लोकांचे सगळे रेकॉर्ड आहेत, किती-किती पैसे घेतले, जे झालं ते क्लिअर आहे, आता ॲडव्हान्स दिला आहे. पुन्हा काही देतील. कोणी म्हणाले १० लाख देऊ, कोणी म्हणतो १५ लाख देऊ, कोणी म्हणतो काँग्रेसचे डबल देऊ अशी चर्चा आहे, असा मोठा दावा विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

**नागपूर विधान परिषद निवडणूक बिनविरोध होणार?**

नागपूर विधान परिषद निवडणूक भाजप बिनविरोध करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. यावरही विजय वडेट्टीवार यांनी भूमिका मांडली. जर निवडणूक बिनविरोध करायची असेल, तर केवळ एका जागेवर नाही, तर सर्वच्या सर्व जागांवर भाजपने चर्चा करावी. आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षात वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या तीनही जिल्ह्यांतून उमेदवारांची नावे आली आहेत. पुढील एक-दोन दिवसांत महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार निश्चित केला जाईल, असं विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.एलळीरींशर्ीी

# विजय थलपतीच्या राज्यात संगमनेरच्या आयपीएस अधिकाऱ्याची चर्चा

## अहिल्यानगरच्या सुपुत्रावर दिली मोठी जबाबदारी





**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** तमिळनाडूच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवत अभिनेता थलपती विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम पक्षाने सत्तेवर झेंडा रोवला आहे. मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर विजय यांनी प्रशासनातही वेगाने बदल सुरू केले असून, त्याचा पहिला मोठा परिणाम आता पाहायला मिळत आहे.राज्यातील पाच भारतीय पोलिस सेवा (IPS) अधिकाऱ्यांसह सहा वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या बदल्यांमध्ये महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरचे सुपुत्र आयपीएस अधिकारी प्रवीण डोंगरे यांची तिरुचिरापल्ली जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री थलपती विजय यांनी त्यांच्यावर दाखवलेला विश्वास सध्या तमिळनाडूच्या प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

प्रवीण डोंगरे हे कर्तव्यदक्ष आणि कठोर अधिकारी म्हणून तमिळनाडूत ओळखले जातात. विशेष म्हणजे ज्या मतदारसंघातून स्वतः विजय निवडून आले होते. त्या त्रिची ईस्ट विधानसभा मतदारसंघात लवकरच पोटनिवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकीपूर्वी प्रविण डोंगरे यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात तिरुवेरुंबूर येथे सहाय्यक पोलिस अधीक्षक म्हणून केली होती. सुरुवातीपासूनच त्यांनी दमदार कामगिरी करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली.

यापूर्वी ते चैन्नईच्या पश्चिम भागातील दक्षता आणि पोलीसांच्या भ्रष्टाचारविरोधी विभागात कार्यरत होते. त्यांच्या कार्यशैलीमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये त्यांची विशेष छाप निर्माण झाली होती. तामिळनाडूचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) के. मणिवसन यांनी या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत.

प्रवीण डोंगरे हे २०१६ बॅचचे आय पी एस अधिकार असून ते मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरमध्ये त्यांचे घर असून त्यांचे प्राथमिक शिक्षणही तेथेच झाले. त्यांनी पेट्रोकेमिकल अभियांत्रिकीमध्ये बीई पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे वडील गटशिक्षणाधिकारी होते, तर त्यांचे एक भाऊ न्यायाधीश आहेत. सामाजिक भान जपत त्यांनी आदिवासी मुलांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्रही सुरू केले होते.युपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर डिसेंबर २०१६ मध्ये त्यांनी नागरी सेवेत प्रवेश केला. कारकिर्दीची सुरुवात तिरुवेरुंबूर येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून केली.

त्यानंतर राज्यपालांचे एडीसी म्हणून त्यांनी २०१९ ते २०२१ दरम्यान राजभवनात सेवा बजावली. पुढे थेनी, मदुराई आणि शिवगंगा जिल्ह्यामध्ये पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. लोकसभा निवडणुकीदरम्यान निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची बदलीही करण्यात आली होती. दरम्यान,त्रिची पोटनिवडणुकीत अभिनेत्री तृणा कृष्णन निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. त्या आधीच मुख्यमंत्री विजय यांनी निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या भागात अनुभवी आणि कडक प्रशासकीय अधिकारी म्हणून ओळख असलेल्या प्रविण डोंगरे यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

# 'आम्ही टाकळीकर' राबविणार जलसंधारणाचा दुसरा टप्पा

## 'जलसंधारणा'त लोकसहभाग सर्वात महत्त्वाचा - सरपंच अरुणा खिलारी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** दिवसेंदिवस पाण्याची पातळी खोल जात आहे, याकरिता गावातील पाझर तलाव, ओढ्यांचे खोलीकरण करणे आवश्यक होते. यासाठी ग्रामपंचायतमार्फत व आम्ही टाकळीकर ग्राम विकास प्रतिष्ठानच्या वतीने राज्य शासनासह अनेक सामाजिक सामाजिक संस्थांना प्रस्ताव दिले होते. यांस मान्यता मिळाल्याने नाम फाऊंडेशन ग्रामपंचायतसह विविध संस्थांनी जलसंधारण कामास सुरुवात केली आहे. या माध्यमातून पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे ही काळाची गरज असून जलव्यवस्थापन ही सरकारची जबाबदारी नसून लोकचळवळ बनली पाहिजे. टाकळी ढोकेश्वर येथिल दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी जलसंधारण, जलसंवर्धन, जलसंधारण सारखे उपक्रम राबवून भूजल पातळी वाढवण्यासाठी पुढाकार घ्यावा. जलसंधारणात लोक सहभाग सर्वात महत्त्वाचा आहे, लोकांनी या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविला पाहिजे असे प्रतिपादन सरपंच अरुणा खिलारी यांनी केले. टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथे नाम फाऊंडेशन, ग्रामपंचायतसह विविध संस्थांच्या माध्यमातून आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या समन्वयाने जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याच्या शुभारंभ नुकताच सरपंच अरुणा खिलारी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव जेष्ठ पत्रकार चाँद शेख,उपसरपंच रामभाऊ तराळ, माजी सरपंच शिवाजी खिलारी, बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ भाऊसाहेब खिलारी, सामाजिक कार्यकर्ते शावण गायकवाड, ग्राम. पं. सदस्य भाऊसाहेब खिलारी, पत्रकार शरदराव झावरे, दादा भालेकर, वसंत रांधवण संतोष सोनावळे, आदिनाथ पायमोडे, संकेत झावरे, शुभम गुंदेचा बाळासाहेब गायकवाड, मंगेश खिलारी, प्रताप खिलारी, अक्षय गोरडे, राहुल झावरे, राहुल झावरे, दिलीप झावरे,बबलू झावरे, जयसिंग झावरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सरपंच अरुणा खिलारी म्हणाल्या, या योजनेअंतर्गत जलसंधारणाचा दुसऱ्या टप्प्यात गावातील पाझर तलाव, केटीवेअर, लोकउपयोग प्रकल्प,बंधाऱ्यातील गाळ काढून त्यांचे खोलीकरण करून संपूर्ण टाकळी गावातील परिसर हा पाणीदार केला जाणार आहे.

**आम्ही टाकळीकर चळवळ क्रांती घडवेल**

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान कृतीशील समूहाच्या माध्यमातून ग्राम विकासाची चळवळ सुरू असून आता यावर्षी जलसंधारणाचा दुसरा टप्पा मोहीम राबवली जात आहे. यामुळे गावातील पाण्याची पातळी वाढवून शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. परिसरात शेतकरी व ग्रामस्थांच्या जीवनात ही जलसंधारण चळवळ नक्की क्रांती घडवेल, आम्ही टाकळीकर चळवळ लोकाभिमुख असून समाजातील सर्व घटकांनी जलव्यवस्थापनासाठी सक्रिय सहभाग नोंदविणे गरजेचे आहे.

**- डॉ. बाळासाहेब बांडे, अध्यक्ष आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान, टाकळी ढोकेश्वर**

# कांद्याला भाव मिळण्यासाठी चांदवडमध्ये विरोधकांचे उग्र 'रस्ता रोको' आंदोलन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** कांद्याचे कोसळणारे भाव आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या या गंभीर प्रश्नांवर आज नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे विविध विरोधी पक्ष आणि शेतकरी क्रांती मोर्चाच्या वतीने 'रस्ता रोको' आंदोलन करण्यात आले. कडाक्याच्या उन्हात सकाळी ९ वाजेपासून सुरू झालेल्या या आंदोलनाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या या आंदोलनामुळे मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर वाहनांच्या कित्येक किलोमीटर लांब रांगा लागल्या होत्या.

**गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारचा निषेध...**

दुष्काळी चांदवड तालुक्यात तापलेल्या उन्हाची पर्वा न करता हजारो शेतकरी आणि शेतमजूर या आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलकांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा तीव्र निषेध केला आणि जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलन अधिक तीव्र करण्यासाठी काही ठिकाणी वाहनांच्या चाकांतील हवा सोडून वाहतूक पूर्णपणे ठप्प करण्यात आली. दरम्यान, काही शेतकरी संघटना आणि विरोधी पक्ष या आंदोलनापासून दूर राहिल्याचेही पाहायला मिळाले.

**आंदोलकांच्या प्रमुख मागण्या :**

- कांद्याला प्रति किलो २४ रुपये हमीभाव मिळावा.
- नाफेड'ने थेट बाजार समितीमध्ये जाऊन कांद्याची खरेदी करावी.
- यापूर्वी विक्री झालेल्या कांद्याला प्रति क्विंटल १,५०० रुपये अनुदान मिळावे.

**...तर मंत्र्यांना मंत्रालयात फिरकू देणार नाही : अंबादास दानवे**

आंदोलनाचे नेतृत्व करणारे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे पत्रकारांशी बोलताना आक्रमक झाले. या आंदोलनाने कांद्याचा प्रश्न सुटला नाही, तर एकाही मंत्र्याला मंत्रालयात फिरकू दिले जाणार नाही. गरज पडल्यास मंत्रालयावर कांदे फेकण्याचे आंदोलन करू, असा इशारा त्यांनी दिला. तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी, या आंदोलनाच्या धसक्यामुळेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उद्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत बैठक घेणार आहेत, असा दावा केला.

**निवडणूक संपताच भाव अर्ध्यावर का? : रोहित पवार**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारच्या हेतूवर सवाल उपस्थित केला. निवडणुकीआधी कांद्याला २४ रुपये भाव होता, मग निवडणूक संपताच तो १२ रुपयांवर का घसरला? नाफेड केवळ २ लाख टन कांदा खरेदी करणार आहे, परंतु प्रत्यक्षात किमान ८ ते १० लाख टन खरेदीची गरज आहे. हे आंदोलन इथेच संपणार नाही, तर पुढील काळात मुंबईत 'शेतकऱ्यांचा लाँग मार्च' काढला जाईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



**दिग्गज नेत्यांची उपस्थिती आणि अटक :** या आंदोलनात खासदार डॉक्टर शोभा बच्छाव (धुळे), खासदार भास्कर भगरे (दिंडोरी), खासदार राजाभाऊ वाजे (नाशिक), खासदार निलेश लंके (अहमदनगर), आमदार रोहित पवार, अंबादास दानवे आणि हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह मविआचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

**पोलिसांची कारवाई :** आंदोलनामुळे महामार्गावरील कोंडी वाढल्याने नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांनी स्वतः आंदोलकांशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. अखेर पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या सर्व प्रमुख नेत्यांना ताब्यात घेऊन चांदवड पोलीस ठाण्यात आणले. तिथे कायदेशीर प्रक्रिया आणि चर्चेनंतर सर्वांची सुटका करण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी कडक बंदोबस्त तैनात केला होता.




## घातक पाकपासून सावध

भारताने ११ मे १९९८ रोजी राजस्थानमधील पोखरण येथे आपली दुसरी अण्वस्त्र चाचणी यशस्वी केली. त्या यशस्वी चाचणीचे एक स्मरण म्हणून या दिवशी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस साजरा केला जातो. डॉ. होमी भाभा यांनी भारताला अण्वस्त्रधारी देश बनविण्याचे स्वप्न पाहिले होते. या दिवशी डॉ. भाभा यांचे स्वप्न साकारले. ही अण्वस्त्र चाचणी करण्यामागे भारतीय तंत्रज्ञानाचे सामर्थ्य जगाला दर्शविणे हाच एकमेव उद्देश नव्हता. या योगे शेजारी पाकिस्तानालाही उघडे पाडण्याचा हेतू होता. आपली चाचणी झाल्यानंतर काही दिवसांतच पाकिस्ताननेदेखील अण्वस्त्र चाचणी केली. त्या चाचणीमुळे पाकिस्तानकडेही अण्वस्त्रे आहेत, हे सिद्ध झाले. त्यामुळे भारत व पाकिस्तान हे दोन्ही देश जबाबदार अण्वस्त्रधारी देशांच्या यादीत आले.

परंतु, दुर्दैवाने पाकिस्तानाचा एकूण इतिहास काही चांगला नाही. अब्दुल कादीर खान उर्फ ए. क्यू. खान यांनी फिनलंडवरून, चीनमधून साहित्य आणून सेंट्रिफ्यूज तयार करत पाकिस्तानाला अण्वस्त्रधारी देश बनवले. इराण, लीबिया, उत्तर कोरिया यांना गुप्त पद्धतीने यासाठीचे तंत्रज्ञान हस्तांतरित केले होते. या सगळ्यामुळे पाकिस्तानवर बंधने आणली गेली होती. या पार्श्वभूमीवर जगाने पाकिस्तानबाबत सावधच राहिले पाहिजे, यात शंका नाही. सन १९७१ नंतर, इस्लामच्या रक्षणासाठी आपला एक 'इस्लामिक बॉम्ब' (अण्वस्त्र) पाहिजे, अशी भूमिका पाकिस्तानचे माजी पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी मांडली होती. त्यास बरीच वर्षे झाली. आता ते यापेक्षा पुढे गेले आहेत. सौदी अरेबिया आणि पाकिस्तानच्या संरक्षण करारात आता तुर्कीयेचाही समावेश झाला आहे, असे समजते. नुकतेच तुर्कीयेने एका प्रदर्शनामध्ये सात हजार किलोमीटरचा पल्ल्याचे आंतरखंडीय क्षेपणास्त्र प्रदर्शित केले. तुर्कीयेने केलेले हे प्रदर्शन हीदेखील समस्त जगासाठी एक चिंतेची बाब आहे. तुर्कीयेचे भौगोलिक स्थान आशिया- युरोपमध्ये मध्यवर्ती ठिकाणी आहे. हे मोक्याचे स्थान पाहता अनेक महत्त्वाचे देश त्याच्या माऱ्याच्या टप्प्यात येऊ शकतात. रशियासह अनेक देशांवर परिणाम होऊ शकतो, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सध्या इराणकडे अण्वस्त्रे आहेत की नाहीत, यावर सर्वत्र जोरात चर्चा सुरू आहे. इराणकडे सध्या ६० टक्के समृद्ध (एनरिच्ड) युरेनियम आहे, असे बोलले जाते. इराणकडील समृद्ध युरेनियम ८० टक्क्यांपेक्षा पुढे गेल्यास त्यांच्याकडे स्वत:चे अण्वस्त्र असू शकते. ते होऊ नये, यासाठी सध्याचे युद्ध व अन्य प्रयत्न सुरू आहेत. इराणमधून जी माहिती सध्या बाहेर येत आहे ती पाहता अमेरिका- इस्त्रायलसोबतचे युद्ध थांबेपर्यंत हा युरेनियमचा साठा ते तिसऱ्या देशाला देतील. नंतर युद्ध थांबल्यानंतर इराण तो साठा परत आणेल. इराणच्या युरेनियमच्या साठ्याजवळ, अणुभट्ट्यांजवळ रशियन शास्त्रज्ञही आढळून आले होते. ते इराणला मदत करत आहेत. मात्र, हे युरेनियम अण्वस्त्रासाठी नाही तर अणुऊर्जेसाठी आहे, असा इराणचा दावा आहे. अमेरिका इराणवर बंधने घालत असली, तरी या प्रकरणात खरा दोषी पाकिस्तान आहे. अमेरिकेने पाकिस्तानला खरे तर 'नॉन नेटो' देशाचा दर्जा दिला आहे. आणि पाकिस्तानला इराणसोबत मध्यस्थी करायला सांगितले गेले आहे. या मध्यस्थीमध्ये नेमके काय सुरू आहे, हे अद्याप फारसे समोर आलेले नाही. इराण आपल्याकडील युरेनियम पाकिस्तानला हस्तांतरित करणार की कसे, हे कोणालाच माहिती नाही. सध्या इराणवर अनेक निर्बंध आहेत. समुद्री मार्गांवरही बंदी आहे. त्याच वेळी पाकिस्तानने आपल्या भू-सीमा हद्दीतील पाच मार्ग इराणसाठी खुले करून दिले आहेत. पाकिस्तानच्या या चाली पाहता, हा देश 'डबल गेम' खेळत असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे संयुक्त अरब अमिरातीने (यूएई) पाकिस्तानवर बंधने घातली आहेत. 'यूएई'मधील शिया मुस्लिमांना पाकिस्तानला परत पाठवण्यात आले आहे. तसेच पाकिस्तानला दिलेले ३.२ अब्ज डॉलरचे कर्जदेखील परत मागितले आहे. त्यामुळे एकूणच आखाती देशात अशांतता निर्माण झाली आहे. पाकिस्तान हा 'अण्वस्त्रसज्ज बंडखोर देश' आहे. त्याचे आणखी काही घातक परिणाम संभावतात. चीन आजवर सातत्याने पाकिस्तानला मदत करत आलेला आहे, हे उघड सत्य आहे. चीनने पाकिस्तानला नुकतीच 'जे ३५' (एफ ३५ ची कॉपी) ही दीर्घ पल्ला गाठू शकणारी शक्तिशाली विमाने दिली आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने पाकिस्तानवर केलेल्या हल्लयांमध्ये किराणा हिलमध्ये असलेल्या अण्वस्त्रांच्या साठ्यांवर हल्ला झाल्याची चर्चा आहे. त्यानंतर पाकिस्तानने किरणोत्सर्ग रोखणारी वाळूदेखील मागवली होती. नंतर किरणोत्सर्ग झाला नसल्याचेही समोर आले. मात्र, त्यांच्या नियंत्रण केंद्राचे (कमांड सेंटर) नुकसान झाले आहे. भारतीय वैमानिकांनी क्षेपणास्त्रांद्वारे केलेल्या अचूक हल्लयांमुळे पाकिस्तान पुरता हादरला होता. त्या वेळी धास्तावलेल्या पाकिस्तानने अमेरिकेकडे धाव घेतली होती. दरम्यान, आणखी एक गोष्ट घडली. बांगलादेशमध्ये डॉ. महंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार असताना बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात सामरिक सहकार्याबाबत चर्चा सुरू झाली होती. त्या वेळी एका प्राध्यापकाने, आपण पाकिस्तानशी संबंध वाढवत आहोत, म्हणजे त्यांच्याकडून अण्वस्त्रांचे तंत्रज्ञानही घेतले पाहिजे; म्हणजे, भारतावर दोन्ही बाजूंनी दबाव आणणे शक्य होईल, अशी मुक्ताफळेही उधळली होती. त्यामुळेच सध्या पाकिस्तान आणि बांगलादेश दोन्हींमधील परिस्थितीवर भारताने खूप बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

**–भूषण गोखले**

# हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे (वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा



समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला.

रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य,


**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला.
बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

# सरकार बदलूनही बांगलादेशातील हिंदूंची स्थिती 'जैसे थे'!

बांगलादेशामध्ये हिंदूंसह अल्पसंख्यांकांचे होणारे दमन अद्याप थांबलेले नाही. 'ह्यूमन राईट्स काँग्रेस फॉर बांगलादेश मायनॉरिटीज'ने प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रीय अहवालात २०२६ च्या जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत हिंदूंवर झालेल्या आत्याच्याराच्या घटनांचा लेखा जोखा मांडला आहे ज्यानुसार या चार महिन्यांत तेथील अल्पसंख्यांकांविरुद्ध छळ आणि हिंसाचार यांच्या ५०५ घटनांची नोंद झाली आहे. ज्यामध्ये १०० हिंदूंच्या क्रूर हत्या करण्यात आल्याची नोंद आहे. देशातील ४७ वेगवेगळ्या जिल्ह्यांत या घटनांची नोंद झाली असून हिंदूंचे अपहरण आणि मॉब लीचिंगच्या १४४ घटना नोंदवण्यात आल्या आहेत.

२८ हिंदू महिलांवर बलात्कार केला गेल्याचीही या अहवालात नोंद करण्यात आली आहे. हिंदूंचे ऊर्जास्रोत असलेली ९५ मंदिरे या चार महिन्यांत धर्मांधांकडून फोडण्यात आली आहेत. अर्थात ही आकडेवारी केवळ पोलीस दरबारी नोंद झालेल्या घटनांची आहे. प्रत्यक्ष आकडे यांपेक्षा कितीतरी अधिक पटीने असू शकतात. भीती आणि तेथील बहुसंख्य समाजाकडून हिंदू समाजावर निर्माण केला जाणारा दबाव यांमुळे असंख्य पीडित पोलीस स्थानकांत जातही नाहीत. एकूणच बांगलादेशमधील पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा अल्पसंख्य हिंदूंचे रक्षण करण्यास पूर्णतः असमर्थ ठरली आहे किंवा तिचाही या सर्व अत्याचाराला पाठिंबा असावा. बांगलादेशात सत्तांतर होऊनही हिंदू आणि इतर दुर्बल समुदायांची स्थिती अजिबात सुधारलेली नाही. बांगलादेशात सुरु असलेला देशाच्या सर्वच ८ प्रशासकीय विभागांतील ६४ जिल्ह्यांपैकी ६२ जिल्ह्यांत पसरला आहे. म्हणजेच देशाचा असा क्वचितच एखादा कोपरा उरला आहे, जिथे अल्पसंख्यांक समाज स्वतःला सुरक्षित समजू शकेल. यात ग्रामीण भागापासून मोठ्या शहरांपर्यंतचा समावेश आहे, जिथे रहाणारी हिंदु कुटुंबे प्रत्येक क्षण भयाच्या छायेत जगत आहेत. अल्पसंख्यांक समुदायातील महिला आणि मुली यांना या हिंसाचारात सर्वाधिक लक्ष्य केले जात आहे. अहवालात महिलांवरील लैंगिक हिंसाचार, बलात्कार आणि सामूहिक बलात्कार यांच्या २८ भयानक घटनांचा उल्लेख आहे, ज्या २३ वेगवेगळ्या जिल्ह्यांत घडल्या आहेत.

हिंदूंच्या वडिलोपार्जित जमिनींवर बळजबरीने नियंत्रण मिळवणे, त्यांच्या घरांना आग लावणे आणि लुटालुटीच्या १३२ मोठ्या घटना समोर आल्या आहेत. पैसा आणि बळ यांचा वापर करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल हिंदूंच्या कुटुंबांना बेघर केले जात आहे, जेणेकरून त्यांना देश सोडण्यास भाग पाडले जावे. बांगलादेशात धार्मिक स्वातंत्र्य केवळ कागदावर आहे. केवळ ४ महिन्यांत हिंदूंची मंदिरे आणि धार्मिक स्थळांवर आक्रमणे अन् तोडफोड यांच्या ९५ घटनांची नोंद झाली आहे. धर्मांध जमाव उघडपणे मंदिरांवर हल्ले करतात मंदिरांतील पवित्र मूर्तींची विटंबना करतात. बांगलादेशातील सत्तांतराचा अल्पसंख्यांकांच्या सुरक्षेवर कोणताही परिणाम झालेला नाही. वर्ष २०२५ मध्ये महंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारच्या १८ महिन्यांच्या कार्यकाळातही हिंदूंवर भीषण अत्याचार झाले होते, ज्याने संपूर्ण जगाला



हादरवून सोडले होते. त्या काळात हिंदूंच्या विरोधात तब्बल साडेतीन हजार आक्रमण- अत्याचार यांच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये जेव्हा नवीन निवडून आलेले सरकार सत्तेत आले, तेव्हा परिस्थिती सुधारेल अशी अपेक्षा होती; परंतु 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी' सरकारच्या काळातही हा हिंसाचार त्याच वेगाने चालू आहे. यावरून हे स्पष्ट होते की, हे संकट कोणत्याही एका राजकीय पक्षाचे नसून तिथल्या व्यवस्थेच्या अपयशाचे लक्षण आहे.

१९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७.९६ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष केले जात आहे, स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात. हे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बांगलादेशातील हिंदूंना दिली जाणारी अन्याय्य वागणूक हा जुना विषय असला तरी गेल्या चार महिन्यांत तेथील हिंदूंची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, हे असेच चालत राहिले तर पुढील काही महिन्यांत बांगलादेशात नावालाही हिंदू शिल्लक राहणार नाही. याउपरांत बांगलादेशातील गरिबीला कंटाळून बांगलादेशी मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत. आजमितीला ही संख्या १० कोटीहून अधिक झाली आहे भारतातील विकसनशील शहरी भागात बांगलादेशी नागरिकांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत. येथील स्थानिक झोपडपट्टी दादा पैशांच्या मोबदल्यात या बांगलादेशी घुसखोरांच्या निवाऱ्याची, नोकरी व्यवसायाची आणि कागदपत्रांची व्यवस्था करून देतात. आजमितीला अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आणि अनधिकृत कामांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याचे सिद्ध झाले आहे. घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्याचा कायदाही अस्तित्वात आहे; मात्र त्याची कठोरपणे अंमलबजावणीच केली जात नाही.

एकीकडे बांगलादेशातील हिंदू नामशेष होऊ लागला आहे तर दुसरीकडे भारतात आलेले बांगलादेशी घुसखोर भारताची अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणू लागले आहेत. देशात राहून देशाशी बेईमानी करणारे काही देशद्रोही नागरिक या बांगलादेशीच्या खाण्याची आणि राहण्याची व्यवस्था करत आहेत, त्यामुळे त्यांना शोधून देशातून हाकलून लावणे पोलिसांनाही जिकरीचे होऊ लागले आहे. मध्यंतरी काही भागांत नागरिकांनीच पुढाकार घेऊन परिसरातील बांगलादेशी नागरिकांना शोधण्याची मोहीम सुरु केली होती; मात्र तीही आता थंडावली आहे. बांगलादेशातून पळून भारतात आलेल्या शेख हसीना यांच्या सुरक्षेत सरकार कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. त्यांच्या पारपत्राची मुदत संपल्यानंतरही सरकारने त्यांच्या व्हिसाची मुदत वाढवली आहे, दुसरीकडे बांगलादेशात प्रतिदिन होणाऱ्या हिंदूंच्या दमनासाठी देशाचे सरकार काहीच पावले उचलताना दिसत नाही. देशाची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था धोक्यात आणणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांबाबत सरकार कोणतेही विशेष धोरण आखताना दिसत नाही त्यामुळे भविष्यात भारतातून घुसखोरांना हाकलण्यासाठी सामान्य जनतेनेच पुढाकार घेतल्यास आश्चर्य वाटायला नको !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## विलासरावजी

सर्वप्रिय विलासराव
मुख्यमंत्री तडफदार
सामान्या तारणहार
जनसंपर्कावर मदार

विकासाची त्रि सूत्री
विश्वास कृति विचार
मांजरा पॅटर्न यशस्वी
पाणीप्रश्ना सुधा धार

बाभळगावाची माती
गाजवे दिल्लीदरबार
दोनवेळेस मुख्यमंत्री
उल्लेखनीय कारभार

मागासलामराठवाडा
बनवलाकारखानदार
जाग्रत केला सहकार
सक्षम चालवे सरकार

सर्व घटका घेऊचाले
सच्चे सुहृदी दिलदार
शेवटचे माणसा स्तव
रे स्वागता सिध्द दार

हजरजबाबी वक्तव्या
मिस्किली खुमासदार
अभ्यासू भाषणे सारी
टाळ्या निनादेआवार

पारदर्शी केलाआपण
खरामाहितीअधिकार
मोनोरेल मिठीप्रकल्प
मुंबईनेमानले आभार

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## केवायसी करूनही 'लाडकी बहीण' योजनेचे पैसे जमा नाहीत; महिलांमध्ये नाराजी



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२६, बोरी (परभणी) :** राज्य शासनाने महिलांना आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने लाडकी बहीण योजना अमलात आणली असून, या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा ₹१५०० देण्यात येतात. अनेक महिलांनी आवश्यक कागदपत्रांसह केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, केवायसी करूनही काही महिलांच्या बँक खात्यात अद्याप योजनेचे पैसे जमा होत नसल्याची बाब समोर येत आहे. त्यामुळे महिलांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

योजनेचा लाभ वेळेत मिळावा, अशी अपेक्षा महिलांकडून व्यक्त केली जात आहे. अनेक महिलांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही रक्कम जमा होत नसल्याने नेमकी अडचण काय आहे, याबाबत प्रशासनाने लक्ष देऊन समस्या सोडवावी, अशी मागणी होत आहे.

तसेच, संबंधित विभागाने लाभार्थी महिलांच्या समस्या समजून घेऊन लवकरात लवकर पैसे जमा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी महिला वर्गातून होत आहे.

## मुलांवर संस्कारांची शिदोरी देणे हीच काळाची गरज : डॉ.अभिजीत जगताप



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२६, सोलापूर :** आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि सोशल मीडियामुळे मुलांसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांमध्ये नैतिक मूल्ये, संस्कार आणि जबाबदारीची जाणीव रुजविणे अत्यंत आवश्यक आहे. संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पालकांनी अधिक जागरूक होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे संशोधन अधिकारी डॉ. अभिजीत जगताप यांनी केले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दशक वर्षपूर्तीनिमित्त समाज कल्याण केंद्र येथे आयोजित आदर्श पालक पुरस्कार वितरण व कृतज्ञता सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जगताप बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट होते. यावेळी सोलापूर जिल्हा गटसचिव सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष विश्वनाथ भोसले, उद्योजक जुगलकिशोर करवा, सपना फायनान्सचे चेअरमन अनिल बुरांडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान प्रतिष्ठानच्या विविध सामाजिक उपक्रमांचे वृत्तपत्रीय प्रदर्शन मान्यवरांच्या हस्ते उद्घाटित करण्यात आले.

डॉ. जगताप पुढे म्हणाले की, अनेक संस्था सुरू होतात; मात्र काळाच्या ओघात बंद पडतात. परंतु श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानने गेल्या दहा वर्षांत सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थी दत्तक योजनेद्वारे अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळाली असून, भविष्यात याच विद्यार्थ्यांतून अधिकारी आणि जबाबदार नागरिक घडतील.

ते पुढे म्हणाले, पालकांनी केवळ कर्तव्य बजावून चालणार नाही, तर मुलांवर चांगले संस्कार घडविणे आवश्यक आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे अनेक सामाजिक अडचणी वाढत आहेत. मुलांनी मोठे झाल्यानंतर आई-वडील आणि आजी-आजोबांचा सन्मान व सांभाळ करणे हीच भारतीय संस्कृतीची खरी ओळख आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश कासट यांनी केले. सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी तर आभार गणेश येळमेली यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष अलकुंटे, महेश भाईकट्टी, अक्षता कासट, शुभांगी लचके, मनश्री कासट, अमृता बच्चल, श्रीरंग रेगोटी, राजेश केकडे, दिपक करकी, शीनाथ श्रीगण, मयुर गवते, गणेश माने, विजय जाधव, अभिजीत व्हानकळस, आकाश लखोटिया, दिनेश मंत्री, सुरेश लकडे, साहेबराव परबत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**आदर्श पालक पुरस्काराने गौरव**

यावेळी विशाखा अनिल बाबरे, अलका संभाजी खंद्रारे, अनिता हनुमंतसिंग राजपूत, रिहाना मदार म कानदार, लता उद्धव इरशेट्टी, सुलक्षणा दत्तात्रय मलगे, संध्या तुळशीदास नारायणकर आणि फजलुन अल्लावल्ली इनामदार यांना आदर्श पालक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. तसेच गेल्या दहा वर्षांत संस्थेला सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचाही कृतज्ञता सन्मान करण्यात आला.

## अहिल्यानगर जिल्ह्यात डिझेलच्या टंचाईमुळे शेतकरी संकटात

### भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** जिल्ह्यात निर्माण झालेल्या डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांची शेती मशागतीची कामे ठप्प होत असल्याने शेतकऱ्यांना तत्काळ पुरेसा प्रमाणात डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी तसेच गृह व पुरवठा शाखेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्यासह राज्य संपर्कप्रमुख अशोक आंधळे, जिल्हा संघटक संतोष वाबळे, जिल्हा संपर्कप्रमुख अरुण बेलकर, जिल्हाप्रमुख सुभाष करंजुले, तालुका सचिव अन्सार पटेल, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब वाळुंज, राजेंद्र कर्डिले आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या जिल्ह्यात डिझेलचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून त्याचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होत आहे. ट्रॅक्टर, पंप, शेती अवजारे व इतर यंत्रसामग्रीसाठी डिझेल अत्यावश्यक असताना अनेक पंपांवर डिझेलचा साठा उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. काही ठिकाणी मर्यादित प्रमाणात डिझेल दिले जात असून ड्रममध्ये डिझेल देण्यासही नकार दिला जात आहे.याशिवाय ट्रॅक्टरसाठी डिझेल घेताना सातबारा उतारा किंवा ट्रॅक्टरचे आरसी बुक मागितले जात असल्याने शेतकऱ्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नांगरणी, पेरणी, फवारणी, मशागत यांसारखी महत्त्वाची शेतीकामे वेळेत होत नसून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढत आहे.

आधीच नैसर्गिक संकटे, अवकाळी पाऊस आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे शेतकरी अडचणीत असताना डिझेल टंचाईमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यामुळे जिल्ह्यासह राज्यातील सर्व पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांना आवश्यक त्या प्रमाणात डिझेल उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने सूचना द्याव्यात, कॅनमध्ये डिझेल देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा तसेच डिझेल देताना सातबारा किंवा आरसी बुकची सक्ती करू नये, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. दरम्यान, शेतकऱ्यांना डिझेलचा पुरवठा सुरळीत न झाल्यास भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्यात येईल,असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## मंद्रूप हदवाड भागात विदारक चित्र ; तुंबलेल्या गटारींमुळे नागरिक त्रस्त



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२६, सोलापूर :** मंद्रूप इंदिरा नगर लोकवस्तीचा आणि अरुंद रस्त्यांचा परिसरात इंदिरा नगर व न्यू माळी गल्ली भागात मागील दोन ते तीन महिन्यांपासून उघड्या व मोडक्या गटारी तुंबलेल्या अवस्थेत असून त्यातील घाण पाणी रस्त्यावरून वाहत असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे कडक उन्हाळ्यातही या गटारींच्या कडेला गवत व छोटी झुडपे वाढल्यामुळे गटारींचा प्रवाह पूर्णपणे बंद आहे.

स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायत प्रशासन विभागाकडून या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. गटारी स्वच्छतेचे काम केवळ कागदोपत्री दाखवून ठेकेदारांची बिले मंजूर करण्याचे काम सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. मंद्रूप उघड्या गटारी स्वच्छ करण्याचे काम एका ठेकेदाराकडे तर झाकीव गटारींची स्वच्छता दुसऱ्या ठेकेदाराकडे दिल्याबद्दल जबाबदारी झटकण्याचा प्रकार सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तुंबलेल्या गटारींमधील दुर्गंधीयुक्त पाणी, शेपटाच्या अळया, जंतू, किडे आणि वाढलेले डास यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी गटारीतील पाणी थेट घरांमध्ये शिरत असून लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः जुने गावठाण, गल्लोगल्ली आणि अरुंद बोळ असलेल्या भागात परिस्थिती अधिक बिकट झाली आहे.

गटारीत साचलेला गाळ, कचरा व वाढलेले गवतामुळे गटारी तुंबत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता आणि डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मंद्रूप ग्रामपंचायत कडे वारंवार तक्रारी करूनही आणि आमच्या भागातील सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या ग्रामपंचायत सदस्याना अनेकदा सांगूनही मागील दोन महिन्यांपासून गटारींची स्वच्छता करण्यात आलेली नाही. तुंबलेल्या गटारीतील दुर्गंधीयुक्त घाण पाणी, अळया, जंतू आणि डासांमुळे आमच्या घरातील लहान मुले वारंवार आजारी पडत आहेत. घरातील वयोवृद्ध व्यक्तींनाही या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे ग्रामपंचायत प्रशासन आमच्या आरोग्याशी खेळत असून भविष्यात कोणतीही मोठी आरोग्य समस्या निर्माण झाल्यास त्याला ग्रामपंचायत जबाबदार राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया अशोक टकले यांनी व्यक्त केली.

## चंद्रपूरच्या चिमुकल्या अधीर जुन्नावारची राज्यभर दखल; ऑलिम्पिकच्या दिशेने टाकले पहिले पाऊल




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** पुणे येथील एल.एक्स.टी. राहुल राणे इंटरनॅशनल स्केटिंग बँकेड ट्रॅकवर राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध नामांकित क्लब व उत्कृष्ट खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

या स्पर्धेमध्ये अंडर-६ वयोगटात इनलाईन प्रोफेशनल स्केटिंग प्रकारात अतिशय चुरशीच्या फेऱ्या पार पडल्या. प्रथम फेरीत ७ स्पर्धक तर दुसऱ्या फेरीत ७ स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. या दोन्ही फेऱ्यांमधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३ स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली होती. अंतिम फेरीत चंद्रपूर जिल्ह्यातील (एसएसकेएम) श्री शंकर क्रीडा मंडळाचा खेळाडू अधीर जुन्नावार याने वेगवान आणि संतुलित खेळ करत द्वितीय क्रमांक पटकावला व रौप्यपदकावर आपले नाव कोरले.

अधीर जुन्नावार हा प्रशिक्षक विनोद निखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली इनलाईन प्रोफेशनल स्केटिंगचा सराव करत असून अल्पवयातच त्याने राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. या यशामुळे त्याची शासनमान्य राष्ट्रीय संघटना रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया (आरएसएफआय) मध्ये निवड झाली आहे. विशेष म्हणजे भविष्यात राष्ट्रीय तसेच ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आरएसएफआय या राष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातूनच खेळाडूंना संधी उपलब्ध होत असते. २०३६ मध्ये भारतात होऊ घातलेल्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर अधीर जुन्नावारची आरएसएफआय मध्ये झालेली निवड ही त्याच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी मोठी पायरी मानली जात आहे. अल्पवयातच मिळविलेल्या या यशामुळे चंद्रपूर जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अधीरवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रशिक्षक, पालक व क्रीडाप्रेमींनी त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## UNESCO सहयोगी राष्ट्रीय स्पर्धेत सई तळेकर आणि प्राजक्ता निकम यांचा कलेचा ठसा




**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२६, सातारा :** अखिल भारतीय सांस्कृतिक संघ UNESCO चे अधिकृत भागीदार आयोजित Culture Forum of Performing Arts 2026 ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा दि. २१ मे ते २४ मे २०२६ दरम्यान पार पडली. या स्पर्धेतील सेमीक्लासिकल कथ्थक नृत्य प्रकारामध्ये सई विलास तळेकर आणि प्राजक्ता पराग निकम यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत तृतीय क्रमांक पटकावला.

विशेष म्हणजे, या दोघींनी स्वतःच्या जिद्दीवर, मेहनतीवर आणि अथक परिश्रमांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या नृत्याची कोरिओग्राफीदेखील पूर्णपणे स्वतः केली होती.

यासोबतच त्यांच्या यशामागे पालकांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सततचा पाठिंबा लाभला. कुटुंबाच्या प्रेरणेने आणि स्वतःच्या कष्टाच्या बळावर त्यांनी हे यश मिळवून कला क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. या उल्लेखनीय यशामुळे त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली असून ही स्पर्धा अंदमान-निकोबार येथे आयोजित करण्यात येणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, कला क्षेत्रात त्यांनी मिळवलेले हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## उल्हासनगरमधील शासकीय आरोग्यसेवा वाऱ्यावर...




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२६, उल्हासनगर (ठाणे) :** उल्हासनगरमधील शासकीय आरोग्यसेवेचे अक्षरशः तीनतेरा वाजले असून रुग्णालयातील डॉक्टरच सुट्टीवर गेल्याने अनेक रुग्णांचे अतिशय हाल होताना पहावयास मिळत आहे. तसेच शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर सुट्टीवर गेल्याने रुग्णांच्या शस्त्रक्रिया देखील महिनाभर लांबणीवर लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत.

या बाबत सविस्तर वृत्त असे आहे की,उल्हासनगरातील मध्यवर्ती रुग्णालयातील डॉक्टर सुट्टीवर असल्याने शस्त्रक्रियेसाठी रुग्णांची महिनाभर अक्षरशः फरफट होत असल्याचे समोर आले आहे.

यावशदकीय मध्यवर्ती रुग्णालयात राजकुमार पासी नावाचा रुग्ण गेल्या तब्बल महिनाभरापासून दाखल असूनही त्याच्या पायाचे ऑपरेशन अद्याप करण्यात आलेले नाही. डॉक्टर सुट्टीवर असल्याचे कारण देत चार वेळा शस्त्रक्रिया रद्द करण्यात आल्याने रुग्ण आणि त्याच्या कुटुंबीयांचा संताप वाढला आहे.

रुग्णाला ऑपरेशन होणार असल्याचे सांगून दिवसभर उपाशी ठेवले जाते; मात्र, नंतर डॉक्टर उपलब्ध नसल्याने शस्त्रक्रिया रद्द झाल्याचे सांगून पुढील तारीख दिली जाते. त्यामुळे राजकुमार पासी यांची मानसिक आणि शारीरिक दोन्ही प्रकारे मोठी फरफट होत आहे. पायाचे ऑपरेशन नेमके कधी होणार...?

असा प्रश्न आता त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांच्या देखरेखीखाली यापूर्वी अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. त्यामुळे एका सामान्य पायाच्या ऑपरेशनसाठी इतका विलंब का होत आहे, असा सवाल रुग्णालय परिसरात उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात डॉ. बनसोडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला, मात्र तो होऊ शकला नाही.

दरम्यान गंभीर रुग्णांना थेट कळव्यातील शिवाजी महाराज रुग्णालयात हलवले जात असल्याने उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयाच्या कार्यक्षमतेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शनिवार असूनही जबाबदार वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने रुग्ण आणि नातेवाइकांमध्ये मात्र तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त केली जात आहे.

# महामार्गावर कासा पोलिसांची मोठी कारवाई

## गुजरातहून येणारा तब्बल ३८ लाखांचा गुटखा जप्त; गुटखा माफियांना कोणाचा आशीर्वाद?



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२६, डहाणू (पालघर) :** महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला गुटखा गुजरात राज्यातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या महाराष्ट्रात आणला जात असून, मुंबई, वसई, भिवंडी, कल्याण यांसारख्या शहरांमध्ये त्याची खुलेआम वाहतूक होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी रात्री करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल ३८ लाख २१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या घटनेमुळे महामार्गावरील गुटखा तस्करीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घोळ टोलनाक्याजवळ सोमवारी संध्याकाळी काही स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना एक संशयास्पद आयशर टेम्पो दिसून आला. याबाबत त्यांनी तात्काळ कासा पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. त्यानंतर पोलिसांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी संयुक्तरित्या सदर वाहन थांबवून चौकशी केली असता, गुजरातहून मुंबईच्या दिशेने महाराष्ट्रात बंदी असलेला मोठ्या प्रमाणातील गुटखा वाहतूक होत असल्याचे उघड झाले.

पोलिसांनी टेम्पोची तपासणी केली असता, एमएच ४८ सीबी १७२६ क्रमांकाच्या आयशर टेम्पोमधून ३४ मोठ्या गोण्यांमध्ये भरलेला गुटखा आढळून आला. या गुटख्याची किंमत तब्बल २७ लाख २१ हजार रुपये असून, वाहनासह एकूण ३८ लाख २१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी वाहन चालक अरमान इस्माईल शेख (वय २१) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याविरोधात विविध कलमांअंतर्गत कासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, कारवाईदरम्यान गुटखा माफियांच्या टोळीतील काही संशयित व्यक्ती परिसरात फिरकत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या अवैध व्यवसाय यामागे नेमके कोणाचे पाठबळ आहे? महामार्गावरून राजरोसपणे सुरू असलेल्या गुटखा वाहतुकीकडे स्थानिक गुन्हे शाखेचे दुर्लक्ष का होते? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, ही कारवाई कासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमर पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक किशोर पवार तसेच कासा पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली. या कारवाईमुळे गुटखा माफियांमध्ये खळबळ उडाली असून, अवैध गुटखा तस्करीच्या साखळीचा मोठा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# थोडक्यात

## बकरी ईद पार्श्वभूमीवर चारठाणा पोलिसांचे पथसंचलन

### संवेदनशील भागात पोलिसांची वाढवली उपस्थिती



**अक्षराज : शेख अलीम**

**दि.२६, चारठाणा (परभणी) :** चारठाणा येथे बकरीद ईदच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी यासाठी चारठाणा पोलिसांच्या वतीने मंगळवार, दि.२६ मे २०२६ रोजी सायंकाळी शहरात प्रभावी पथसंचलन करण्यात आले. या पथसंचलनाचे नेतृत्व पोलीस सहाय्यक निरीक्षक मुंजाजी दळवे यांनी केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल राठोड, डीएसबी शाखेचे उमेश बाराते, हजरी मेजर शेख जिलानी, कोणार्डे, उद्धव माने, सातपुते, शेख मुजीब, गिराम, गोरे, महिला पोलीस पौल तसेच होमगार्ड सहभागी झाले होते.

एकूण २६ पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांच्या सहभागाने शहरातील प्रमुख मार्ग, बाजारपेठ, बस स्थानक, देशमुख मेडिकल, महावीर चौक तसेच संवेदनशील व गर्दीच्या ठिकाणी नियोजनपूर्वक पथसंचलन करण्यात आले. पोलिसांच्या या संचलनामुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले.

चारठाणा शहरात बकरीद ईद शांततेत व सलोख्याच्या वातावरणात पार पडावी. यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क असून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. असे मुंजाजी दळवे यांनी सांगितले.

## शेतकऱ्यावर बिबट्याची झडप; शेतकरी गंभीर जखमी



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२६, चिमूर (चंद्रपूर) :** सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही येथील जंगल परिसरात चार महिलांना वाघाने ठार केल्याची घटना ताजी असताच सोमवारी चिमूर तालुक्यातील सावरी बीड येथील शेतकरी प्रकाश गुलाब पाटीलबसलेल्या (५५) यांना शेतात दबा धरून बसून असलेल्या बिबटयाने झडप घेऊन गंभीर जखमी केले. या घटनेने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

चिमूर तालुक्यातील वरोरा मार्गावरील शेवटच्या टोकावर प्रकाश गुलाब पाटील यांची शेती सावरी गुजगव्हाण या मार्गावर आहे. काही दिवसावर शेतीचा खरीप हंगाम सुरू होत असून शेतीची मशागत करण्याचे कामे जोरात सुरू आहे. सध्या उन्हाचा पारा ४६ अंशावर गेलेला असून, त्यामुळे बळीराजा शेतातील सकाळच्या सुमारास कामे करतात. शेतात भाजीपाला लागवड केलेली आहे. या झाडांना पाणी देण्यासाठी म्हणून प्रकाश पाटील हे शेतात सकाळी सुमारास गेले होते. दरम्यान शेतात दबा धरून बसून असलेल्या बिबट्याने झडप घेऊन गंभीर जखमी केले. यावेळी मोठी झटपट झाली असून, जवळपासच्या शेतातून शेतकऱ्यांनी आरडाओरडा केला. शेवटी बिबटयाने प्रकाशला सोडून धूम ठोकली. त्यामुळे शेतकरी थोडक्यात बचावले. जखमी शेतकऱ्याला सावरी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता, वैद्यकीय अधिकारी डॉ.नितीन चौधरी यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी चिमूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. सदर घटनेची माहिती प्रादेशिक वन विभागाला माहिती होताच प्रादेशिक वन विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी किशोर देउळकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक यांनी घटनेचा पंचनामा केला असून पुढील तपास वनविभागाची चमू करीत आहे.

# सुजित झावरे यांची उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मागणी

## पारनेर तालुक्यातील ११ गावांचा विजेचा प्रश्न कायमचा सुटणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याचा भौगोलिक विस्तार अत्यंत मोठा असल्याने तालुक्याच्या शेवटच्या टोकाला असणार्या गावांना सध्या अत्यंत कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी वासुंदे येथे नवीन विद्युत उपकेंद्र मंजूर करावे, अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. या संदर्भातील शिफारस मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्र्यांकडे करण्यात यावी, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.



उपमुख्यमंत्री शिंदे यांना दिलेल्या निवेदनात झावरे पाटील यांनी पारनेरमधील वीज समस्येकडे लक्ष वेधले आहे. तालुक्याच्या ग्रामीण आणि दुर्गम भागातील शेतकरी आणि नागरिकांना अपुर्या आणि कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. पिकांना पाणी देणे असो वा घरगुती वापर, कमी दाबाच्या विजेमुळे उपकरणांचे नुकसान होते आणि शेतीचेही मोठे नुकसान होत आहे.

> कमी दाबाने वीज पुरवठ्याचा फटका पारनेर तालुक्याच्या शेवटच्या टोकावरील गावांना सध्या तीव्र वीज टंचाई आणि कमी दाबाने वीज पुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. वासुंदे येथे विद्युत उपकेंद्र मंजूर झाल्यास परिसरातील ११ गावांचा विजेचा प्रश्न कायमचा सुटेल, यासाठी जागा उपलब्ध असून, प्रस्तावही दिलेला आहे. हा लोकहिताचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्र्यांच्या शिफारसीची मागणी केली आहे.
>
> **- सुजित झावरे पाटील (जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष)**

वासुंदे या ठिकाणी नवीन विद्युत उपकेंद्र उभारल्यास परिसरातील ११ गावांमधील विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार आहे. विशेष म्हणजे, या उपकेंद्रासाठी वासुंदे येथे आवश्यक असलेली जागाही उपलब्ध आहे. तसेच यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव आधीच ऊर्जा विभागाकडे सादर करण्यात आला आहे. हा प्रश्न तातडीने सुटावा, यासाठी उपमुख्यमंत्री स्तरावरून मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्र्यांकडे विशेष शिफारस व्हावी, अशी आग्रही मागणी झावरे पाटील यांनी केली आहे. उपमुख्यमंत्र्यांनी यावर सकारात्मक पाऊल उचलण्याचे आश्वासन दिले असून, यामुळे पारनेरच्या ग्रामीण भागाला मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

# चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी धडकल्या पेट्रोल पंपावर; साठा रजिस्टरची तपासणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** पश्चिम आखाती युध्दाच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यात पेट्रोल - डिझेलची टंचाई जाणवू नये, ग्राहकांना नियमितपणे पेट्रोल –डिझेल मिळावे तसेच साठेबाजी व काळाबाजारी रोखण्यासाठी दि.२५ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी वसुमना पंत थेट पेट्रोल पंपावर धडकल्या.

चंद्रपूर - नागपूर महामार्गावर, शहरात असलेल्या कोटपल्लीवार यांच्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोल पंपावर जिल्हाधिकाऱ्यानी अचानक भेट देऊन साठा रजिस्टरची तसेच दैनंदिन साठ्याबाबत असलेल्या ॲपची सुध्दा पाहणी केली. सद्याच्या परिस्थितीत तेल कंपन्यांकडून पेट्रोल – डिझेलचा पुरवठा सुरळीत होत आहे का, गत आठवड्याच्या स्थितीत आता सुधारणा झाली का, एका दुचाकी किंवा चारचाकीला किती मर्यादेत पेट्रोल – डिझेल देण्याचे नियोजन केले आहे, शेवटचा स्टॉक कधी आला. पेट्रोल पंपावर ग्राहकांची झुंबड असते का, औद्योगिक जिल्हा असल्यामुळे मोठमोठे ट्रक कुठून पेट्रोल - डिझेल भरतात, युध्द परिस्थती नसतांना दररोज किती टँकर येत होते व सद्यस्थितीत



## ग्राहकांसोबत साधला संवाद

किती येतात, आर्दीबाबत विचारणा करून त्यांनी माहिती जाणून घेतली. यावेळी जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या, कॅनमध्ये तसेच बॉटलमध्ये पेट्रोल - डिझेल विकणे हे अनधिकृत आहे. असे होऊ देऊ नका. तसेच दररोज किती साठा उपलब्ध असतो, त्याचा फलक दर्शनी भागात लावावा, जेणेकरून नागरिकांना तो बघता येईल. पेट्रोल - डिझेलची काळाबाजारी व अवैध साठेबाजी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. पेट्रोल पंप चालक व्ही.एम. कोटपल्लीवार यांनी सांगितले की, गत आठवड्याच्या परिस्थितीत आता सुधारणा झाली आहे.

नियमितपणे पेट्रोल आणि डिझेलचे टँकर उपलब्ध होतात. कधीकधी अफवांमुळे ग्राहक अचानक गर्दी करतात, तेव्हा थोडी अडचण होते, मात्र स्टॉक संपला असे सहसा होत नाही. तसेच बहुतांश मोठमोठे ट्रक, शहराच्या बाहेर असलेल्या पंपावरून पेट्रोल - डिझेल खरेदी करतात. आमच्याकडे कॅनमध्ये पेट्रोल - डिझेल दिले जात नाही, अशी माहिती त्यांनी दिली.

सदर भेटीदरम्यान जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादुरकर, खरेदी अधिकारी राहुल वानखेडे, अन्नधान्य वितरण अधिकारी सुमेध चवरे, पेट्रोलपंप चालक व्ही.एम. कोटपल्लीवार आदी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्याचा ग्राहकांशी संवाद यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी ग्राहकांशी संवाद साधला.

वाहनामध्ये किती पेट्रोल भरता, पहिले कमी आणि आता टंचाईमुळे जास्त पेट्रोल भरत आहे का, पेट्रोल भरायला आहे आणि मिळाले नाही, असे कधी झाले का, पेट्रोल - डिझेल बरोबर मिळते का, की त्यात कर्मचा-यांकडून कपात केल्याचे कधी निर्दशनास आले का, अशी विचारणा केली. जिल्ह्यातील शिल्लक साठा २४ मे २०२६ अखेरपर्यंत जिल्ह्यात पेट्रोलचा एकूण साठा ९ लक्ष ७८ हजार ५७१ लिटर, यापैकी विक्री २ लक्ष २२ हजार ६५९ लिटर तर शिल्लक पेट्रोल साठा ७ लक्ष ५५हजार ९१२ लिटर. डिझेलचा एकूण साठा ११ लक्ष ९ हजार १६२ लिटर, यापैकी विक्री ४लक्ष २३हजार ७६०लिटर, शिल्लक साठा ६ लक्ष ८५हजार ४०२लिटर. तर एलपीजी सिलिंडरचा एकूण साठा १७४४८, विक्री ६५६७ आणि शिल्लक साठा १०८८१ होता.

## शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी; जिल्ह्यातील ३९५ विद्यार्थी पात्र

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२६, ठाणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित इयत्ता ५ वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (झणझ) व इयत्ता ८ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा सन २०२६ च्या अंतरिम निकालात ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्ह्यातील एकूण ३९५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

इयत्ता ५ वीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यातील ५०९१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४६७० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. यामध्ये ३८४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. शहापूर तालुक्यातील तब्बल २५६ विद्यार्थी पात्र ठरून तालुक्याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुरबाड तालुक्यातील ६७, भिवंडीतील ३४, कल्याणमधील १६ आणि अंबरनाथमधील ११ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. तसेच इयत्ता ८ वीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यातील ६८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६१५ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. यामध्ये ११ विद्यार्थी पात्र ठरले असून शहापूर तालुक्यातील ८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. मुरबाड तालुक्यातील २ व अंबरनाथ तालुक्यातील १ विद्यार्थी पात्र ठरला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिलेल्या सूचनेनुसार सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी व्हावी तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी यासाठी इयत्ता ५ वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व इयत्ता ८ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा या शिष्यवृत्ती परीक्षांसाठी नोंदणी करण्यात आली होती. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, जादा तासिका, सराव परीक्षा, पालकांचे सहकार्य तसेच विविध सामाजिक संस्थांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. अनेक सामाजिक संस्था, शिक्षक संघटना व उपक्रमशील शिक्षक विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन, प्रश्नसंच व सराव परीक्षा उपलब्ध करून देत आहेत.

जिल्हा परिषद शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देत विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील राज्यस्तरावर यश संपादन करत असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्याच्या विद्यार्थ्यांचे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राबविण्यात येणारे उपक्रम निश्चितच सकारात्मक परिणाम देत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासासाठी शिष्यवृत्ती प्रक्रिया ही 'शहापूर पॅटर्न' पद्धतीने संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. तसेच मिशन भरारी, एनएमएमएस आणि नवोदय शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे. संपूर्ण जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत संपादन केलेल्या यशाबद्दल सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि मार्गदर्शकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

## राज्यपालांच्या उपस्थितीत 'टीबी मुक्त मुंबई' अभियानाला सुरुवात

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, मुंबई :** 'टीबी मुक्त भारत अभियान' मुंबईच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयोजित या अभियानाचा शुभारंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत सायन येथील लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय येथे आज करण्यात आला. राज्यपालाच्या हस्ते राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवी संस्थांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. लोकभवनच्या पुढाकाराने आयोजित 'टीबी मुक्त मुंबई' मोहिमेच्या उद्घाटनाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, आमदार कॅप्टन तमिल सेल्वन, आमदार डॉ. ज्योती गायकवाड, आमदार सुनील शिंदे, महानगर पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य समितीचे अध्यक्ष हरीश भांदिर्गे, शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजेश्री शिरवाडकर, मार्केट व गार्डन समितीचे उपाध्यक्ष भास्कर शेट्टी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, डॉक्टर्स, आशा सेविका आणि महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी 'टीबी मुक्त मुंबई' च्या अभियानावर




आधारित माहिती पुस्तकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. बृहन्मुंबई आणि आसपासच्या परिसराची लोकसंख्या जवळपास दोन कोटींच्या घरात पोहोचली आहे. दाट लोकवस्तीमुळे टीबीसारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्याचा धोका अधिक आहे.